महा मेट्रो

NAGPUR METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

# श्री.निबूरकर,श्रीमती.अदभुते,श्री.चहांदे ठरले महा कार्डचा सर्वात जास्त वापर करणारे मानकरी

## लकी ड्रॉ काढत विजेत्यांची घोषणा

नागपूर २१ मार्च : सर्व स्तरांवर कॅशलेस पेमेंटवर सातत्याने भर दिला जात असताना, नागपूर मेट्रोचे कॉमन मोबिलिटी कार्ड असलेले महा कार्डचा वापरात ही दिवसेंदिवस वाढ होत आहे. महाकार्डचा वापर सातत्याने वाढत असून श्री. प्रभाकर निबूरकर,श्रीमती. भूमिका अदभुते,श्री.समीर चहांदे हे सर्वात जास्त महा कार्डचा उपयोग करणारे मानकरी ठरले आहे.

मुख्य म्हणजे महाकार्डचा वापर वाढवण्यासाठी आणि तिकीट-संबंधित व्यवहारांसाठी रोखीचा वापर टाळण्यासाठी, महा मेट्रोने लकी ड्रॉ प्रणाली सुरू केली आहे. त्यानुसार दर महिन्याला सोडत काढण्यात येत असून एका महिन्यात जास्तीत जास्त महा कार्ड वापरणाऱ्या व्यक्तीला बक्षीस दिल्या जाते. महा कार्डच्या पहिल्या तीन जास्त वापरकर्त्यांना महा मेट्रो नागपूर तर्फे बक्षीस दिले जाते.

महा कार्डचा साधारणतः १९% इतका उपयोग होत असून येत्या काळातही हा ट्रेंड कायम राहणार असल्याने महाकार्डच्या वापराची टक्केवारी मध्ये भविष्यातही आणखी वाढ होणार आहे.

महा मेट्रो नेहमीच प्रवाश्याना कॅशलेस पेमेंटचा उपयोग करण्याकरिता प्रोत्साहित करत असून महाकार्ड व्यतिरिक्त, महा मेट्रो ऍपचा  जास्तीत जास्त उपयोग करण्यास प्रोत्साहित करते. क्यूआर (QR) कोड वापरून अँप डाउनलोड केले जाऊ शकते आणि योग्य औपचारिकता पूर्ण केल्यानंतर प्रवासी भाडे दिले जाऊ शकते. पेमेंटसाठी महाकार्ड किंवा ॲपचा वापर केवळ डिजिटल पेमेंटला चालना देण्यास उपयुक्त असून याद्वारे रोख व्यवहार टाळता येईल व मेट्रो ट्रेनच्या प्रवासासाठी तिकीट खरेदी करण्यासाठी लागणारा वेळ देखील कमी होईल.